# पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ४५ /२०२३ — दि. २१/०३/२०२३

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

ज्याअर्थी, विठ्ठलवाडी व उल्हासनगर अंतर्गत नववर्षाकरीता दि. २३/०३/२०२३ रोजी **सिंधी बांधवांचा 'चेटीचंड उत्सव'** साजरा करण्यात येणार असून सदर मिरवणुकीत मोठया प्रमाणात सिंधी बांधव सामील होणार आहेत. सदरची मिरवणुक चालीया साहेब मंदिर उल्हासनगर–५ येथे समाप्त होणार आहे. सदर मिरवणुकीच्या दरम्यान मिरवणूक मार्गावर वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **डॉ. श्रीकांत परोपकारी, पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, अतिरिक्त कार्यभार पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) श्रीराम चौक – ओ.टी सेक्शन चौक – मेनबाजार – व्हिनस चौक – नेताजी चौक – भाटीया चौक – ३९ सेक्शन – गाऊन बाजार – दुध नाका – मठ मंदिर चौक – या मिरवणुकीच्या मार्गावर सर्व प्रकारच्या वाहनांना मठ मंदीर चौक पर्यत नो पार्किग व प्रवेश बंद करण्यात येत आहे. (दि. २३/०३/२०२३ रोजी सकाळी ११:०० वा. ते मिरवणूक संपेपर्यंत सर्व वाहनांना पार्कीग करण्यास मनाई करण्यात येत आहे.)

**पर्यायी मार्ग –** अ) श्रीराम चौक – श्रीराम चौक कडून ओटीसी सेक्शन कडे जाणारी वाहने श्रीराम चौक पेट्रोल पंपाचे बाजूने व्हीटीसी रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

**पर्यायी मार्ग –** ब) ओटीसी सेक्शन – ओटीसी सेक्शन कडून मेन मार्केट कडे जाणारी वाहने उल्हासनगर स्टेशन मार्गे इच्छित स्थळी जातील.

**पर्यायी मार्ग –** क) नेताजी चौक – नेताजी चौक कडून व्हिनस चौक कडे जाणारी वाहने लाल चौक व माणेरे गाव रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

**पर्यायी मार्ग –** ड) कैलास कॉलनी – कैलास कॉलनी कडून भाटिया चौक व नेताजी चौक कडे येणारी वाहने संभाजी चौक व उल्हासनगर स्टेशन मार्गे इच्छित स्थळी जातील.

**पर्यायी मार्ग –** इ) दूधनाका – दूधनाका कडून ओटीसी गाऊन मार्केट कडे येणारी वाहने ओटीसी सेक्शन उल्हासनगर ५ मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना दिनांक २३/०३/२०२३ रोजी सकाळी ११:०० वा. पासून २४:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदरची वाहतुक अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

( डॉ. श्रीकांत परोपकारी )
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे शहर,
अतिरिक्त कार्यभार
पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदरची अधिसचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

Scanned with CamScanner

**प्रत माहितीसाठी सादर,**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, ठाणे शहर.
मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर.
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद.

**प्रत कार्यवाहीसाठी** :–
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–४ उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष,ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– सपोआ वाहतूक विभाग, उल्हासनगर व सर्व संबंधीत प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा.उल्हासनगर च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक ठिकाणी सुचना फलक लावून घ्यावीत.

Scanned with CamScanner